


परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 264 | शनिवार दि. 25 ऑक्टोबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## फलटण येथील महिला डॉक्टर बाबत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी, दोषींना कडक शासन व्हावे - धनंजय मुंडे

### मुंडे व बीडची आहे म्हणून तिच्या तक्रारी डावलल्या असतील तर हे अतिशय गंभीर

मुंबई (प्रतिनिधी) - सातारा जिल्ह्यातील फलटण येथे रुग्णसेवेत असलेल्या व मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कोठरबन गावची रहिवासी असलेल्या एका महिला डॉक्टरने आज आत्महत्या केली असून, तिने आत्महत्या करण्याची कारणे देताना काही गंभीर आरोप केले आहेत. ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, सदर महिला डॉक्टरच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या दोषींना कठोर शासन केले जावे, अशी मागणी माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्ट व्दारे केली आहे.

याबाबत आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्या पत्र देणार असून, या घटनेची स्वतंत्र एस आय टी स्थापन करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही आपण पत्राद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे.

शारीरिक शोषणासह सदर डॉक्टर महिलेस खोटी ... आरोग्य प्रमाणपत्रे देण्याबाबत काही ... जण दबाव आणत ... होते तसेच ... याबाबत वरिष्ठ



अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता त्यांनी तुम्ही मुंडे आहात, बीडच्या आहात, बीडचे मुंडे कसे आहेत, आम्हाला माहीत आहे, असे म्हणत तिच्या तक्रारी डावलल्या असेही तिने लिहिलेल्या एका चिठ्ठीत उल्लेख आहे. संबंधित वरिष्ठांनी जर वेळीच दखल घेतली असती तर कदाचित आज तिच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली नसती.

हे प्रकरण अतिशय गंभीर असून, शारीरिक अत्याचार, मानसिक छळ करणाऱ्या सर्व दोषींना तसेच मुंडे आहे म्हणून तक्रार डावलणाऱ्या सर्वांचीच एस आय टी स्थापन करून चौकशी केली जावी व दोषींना कठोर शासन केले जावे, अशी मागणी मुंडेंनी केली असून, याबाबत आपण उद्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून सविस्तर मागणी करणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी आपल्या एक्स पोस्ट मध्ये म्हटले आहे.

## घर की मुर्गी दाल बराबर बाहेरून आलेले सावजी चिकन', भाजपमधील इनकमिंगवर नितीन गडकरींचा खणखणीत इशारा



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मोठा भाऊ होण्यासाठी भाजप आसुसलेला आहे. भाजपला आता जिल्हा परिषद, महापालिकेत सर्वात अधिक जागा हव्या आहेत. त्यासाठी भाजपमध्ये विविध पक्षातून मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरु आहे. त्यावर केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी पक्षाला घरचा आहेर दिला. या आयाराम-गयाराम संस्कृतीने पक्षाचे नुकसान होत असल्याची ओरड कालपरवाच सोलापूर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांनी केली. त्यानंतर नितीन गडकरी यांनी पक्षाचे कान टोचले.प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांवर या आयाराम-गयारामांमुळे अन्याय होत आहे. ही बाब गडकरी यांना रुचली नसल्याचे समोर आले आहे. त्यांनी त्यांच्या भावना पान 3 वर

## आज ठळक

### कृषी संशोधक विद्यार्थी वाऱ्यावर; दोन वर्षांपासून शिष्यवृत्ती देण्यास सरकारकडून टाळाटाळ




मुंबई : कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून पीएच.डी कृषी फेलोशिप योजना सुरु करण्यात आली असून या शिष्यवृत्तीद्वारे पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि व्यावसायिक प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली जाते.

मात्र मागील दोन वर्षांपासून कृषी क्षेत्रातून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच देण्यात आलेली नाही. वारंवार मागण्या करून, तसेच मंत्रिमंडळामध्ये विषय मांडण्याचे आश्वासन देऊन सरकारने विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.बदलते हवामान, जमिनीची उद्ध्वस्त स्थिती आणि उत्पादन क्षमता वाढवण्याच्या गरजेमुळे कृषी संशोधनात नवकल्पना आणि प्रगत अभ्यासाची नितांत गरज भासत आहे. या पार्श्वभूमीवर, कृषी क्षेत्रातील उच्चस्तरीय संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी विविध संस्था आणि शासन स्तरावर पीएच.डी. कृषी पान 3 वर

### बेकायदेशीर बांगलादेशींना शिधापत्रिका देऊनये, सरकारी लाभ रोखावेत – राज्य सरकारचे आदेश



मुंबई: बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांकडून शिधावाटप दुकानांपासून ते सर्व लाभ घेतले जातात. या बांगलादेशींना रोखण्यासाठी आता अन्न व नागरी पुरवठा विभागाने मोहीम उघडली असून या बेकायदेशीर स्थलांतरितांना काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे.

या बांगलादेशी घुसखोरांची यादी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यांच्याविषयीचा अहवाल दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) सोपविण्यात येणार आहे.अन्न व नागरी पुरवठा विभागाने एक परिपत्रक जारी केले आहे. राज्यातील बांगलादेशी घुसखोरांचे वाढते प्रमाण, त्यांचा राष्ट्रीय सुरक्षेला असणारा धोका तसेच शासकीय सुविधांचा आणि कल्याणकारी योजनांचा गैरवापर होऊ नये यासाठी राज्य सरकारने आधीच नवीन शिधापत्रिका देताना घ्यावयच्या काळजीबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.दहशतवादविरोधी पथकाकडून आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार सर्व कार्यालयांना बांगलादेशी घुसखोरांसंदर्भात काळी यादी तयार करण्यास सांगण्यात आली आहे. याविषयीची माहिती एटीएसला कळविण्यात यावी. त्याचप्रमाणे त्यांची शिधापत्रिका तत्काळ रद्द कराव्यात असे आदेश अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आले आहेत.

दहशतवाद विरोधी पथकाकडून 1 हजार 274 बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांची यादी सर्व कार्यलयांना पाठविण्या पान 3 वर

## परळी : नगर परिषद निवडणुकीतील उर्वरित इच्छुकांच्या धनंजय मुंडे आज (शनिवार) घेणार मुलाखती

### ➲ दुपारी एक वाजल्यापासून विशेष शासकीय विश्रामगृह येथे होणार मुलाखती



परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - राज्यात होऊ घातलेल्या नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे हे परळी वैद्यनाथ नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेत असून, आज (शनिवार, ता. 25) प्रभाग क्रमांक 9 पासून उर्वरित सर्व प्रभागांच्या मुलाखती घेणार आहेत.

धनंजय मुंडे यांनी या आधी प्रभाग क्रमांक 1 ते 8 मधील इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या असून आज दुपारी एक वाजल्यापासून प्रभाग क्रमांक 9 ते उर्वरित प्रभागांच्या मुलाखती शहरातील विशेष शासकीय विश्रामगृह येथे घेणार आहेत. नोंदणीकृत इच्छुक उमेदवारांनी या पान 3 वर

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत रविवारी परळीत भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक व दीपावली स्नेह मिलन



वैजनाथ।दिनांक 24। राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येत्या रविवारी म्हणजेच 26 ऑक्टोबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम व बैठकीचे आयोजन केले आहे.

26 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता शहरातील हालगे गार्डन येथे हा स्नेह मिलन कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला स्वतः पंकजाताई मुंडे उपस्थित राहून कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास जिल्ह्यातील भाजपाचे आमदार, माजी आमदार, सर्व प्रमुख पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत पान 3 वर

## आता मौन नाहीउत्तर द्या! बच्चू कडू यांचा एल्गार, 7/12 कोरा करण्याविषयी मुख्यमंत्र्यांना विचारला जाब




प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा ठेवणीतील शस्त्र बाहेर काढले आहेत. दिवाळीत त्यांनी रवी राणा आणि नवनीत राणा यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले होते. आता त्यांनी पुन्हा सरकारकडे, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मोर्चा वळवला आहे. शेतकऱ्यांचा 7/12 कोरा करण्यासाठी त्यांनी एल्गार पुकारला आहे. नव्याने आंदोलनाची हाक दिली आहे. यावर्षी जून महिन्यात त्यांनी सरकारच्या नाकात चांगलाच दम आणला होता. त्यावेळी अन्नत्याग आंदोलन केले होते. तर नंतर कर्जमाफीसाठी त्यांनी विदर्भ पिंजून काढला होता. अनेक जिल्ह्यात त्यांनी कर्जमाफीसाठी पदयात्रा काढली होती. यावर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बच्चू कडू यांनी कर्जमाफी, 7/12 कोरा करण्यासाठी अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. 7 व्या दिवशी आंदोलन पेटल्यानंतर तातडीने सरकारने त्यांना पान 3 वर

## छत्रपती संभाजीनगर : संघ कार्यालयावर वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा;

### » रा. स्व. संघ मुर्दाबादच्या घोषणा



छत्रपती संभाजीनगर : शैक्षणिक संकुलात राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने सुरु केलेल्या नोंदणीच्या विरोधात आक्षेप घेतल्याने दोन युवकांवर दाखल झालेल्या गुन्हाच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शहरातील क्रांती चौकापासून मोर्चा काढण्यात आला. आरएसएस कार्यालयावरचा हा पान 3 वर

## गंगा माऊली शुगर मुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ; आमचे स्वप्न साकार झाले- खा रजनीताई पाटील

### » गंगा माऊली शुगरचा चौथ्या गळीत हंगामाचा शुभारंभ; विखे पाटील कारखाना लक्ष्मणराव मोरे यांच्याकडे हस्तांतरित केल्याचे समाधान

प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी विखे पाटील कारखाना लक्ष्मणराव मोरे यांच्याकडे हस्तांतरित केल्यानंतर आम्हाला आमच्या मनातील दिवस पाहायला मिळाल्याचे समाधान आहे. चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांचे उत्कृष्ट नियोजन लाभल्याने अल्पावधीतच गंगा माऊली कारखाना नावारुपाला आला आहे. आपणही सर्वांनी कारखान्याला सहकार्य करुन



कारखान्याला प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन खासदार रजनी पाटील यांनी केले. त्या गंगा माऊली शुगरच्या चौथ्या गळीत हंगामाच्या शुभारंभप्रसंगी बोलत होत्या.

मागच्या तीन वर्षांपासून विक्रमी गाळप करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे वेळेवर देणाऱ्या गंगा माऊली शुगरच्या चौथ्या गाळप हंगामाचा पान 3 वर

## सीटू कामगार संघटनेचे आज परळीत अधिवेशन

### राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.डी. एल.कराड यांची उपस्थिती

परळी / प्रतिनिधी बीड जिल्हा सीटू कामगार संघटनेचे 5 वे अधिवेशन परकी येथील विठ्ठल मंदीरात आज दि 25 अक्टोबर रोजी होणार आहे. अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र सीटू संघटनेचे महासचीव कॉ.एम.एच. शेख, प्रमुख उपस्थिती म्हणून सिटू संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.डी. एल.कराड, प्रमुख पाहूणे म्हणून संभाजी नगर सीटूचे कॉ. लक्ष्मण साक्रूडकर उपस्थित रहापार आहे.

या अधिवेशनात मागील 3 वर्षात संघटनेने केलेल्या कामाचा आढावा घेतला जाणार आहे. बीड जिल्हा संघटनेत बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटना, बीड पान 3 वर

## टोकवाडी पंचायत समिती गणात सदस्यपदासाठी रतन रोडे हे प्रबळ दावेदार..!



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- परळी तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असुन टोकवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते रतन रोडे हे पंचायत समिती सदस्य पदासाठी प्रबळ उमेदवार असुन त्यांच्या नावाची सद्या टोकवाडी पंचायत समिती गणातील गावा गावात व वार्डा-वार्डात सर्वत्र चर्चा आहे.

टोकवाडी येथील रतन रोडे हे अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवले नेहमीच सक्रिय सहभाग नोंदवितात. गावा गावातील पाणी, रस्ते आदी प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच ते पुढाकार घेत असतात. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीचे वारे वाहू लागले आहेत. टोकवाडी पंचायत समिती गण अनुसूचित जमातीसाठी राखीव असून यासाठी टोकवाडी येथील रतन रोडे हे प्रबळ उमेदवार आहेत अशी चर्चा तरुण युवकांची व ग्रामस्थांची मध्ये आहे. त्यामुळे या निवडणुकी ते सदस्य पदाची निवडणुक पान 3 वर

## जनतेच्या मनात रुजलेलं नाव सौ. संतोशिला बालाजी मुंडे नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणात



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) "सेवा हीच माझी ओळख, विकास हेच माझं ध्येय" या निर्धारासह गुरुकृपा नगरच्या सौ. संतोशिला बालाजी मुंडे यांनी परळी नगरपरिषदेच्या सदस्यपदाच्या निवडणुकीत प्रभाग क्र. 14 मधून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले आहे.

युवक नेते व समाजसेवक बालाजी मुंडे यांच्या पत्नी असलेल्या सौ. संतोशिला मुंडे या आपल्या सौम्य स्वभावाने, सामाजिक कार्यातील सहभागाने आणि लोकांशी असलेल्या आत्मीय नात्याने परिसरात लोकप्रिय आहेत. महिला मंडळाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले असून, महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.

बालाजी मुंडे यांचा दमदार जनसंपर्क आणि युवकांमध्ये असलेली त्यांची लोकप्रियता हा या कुटुंबाचा मोठा बळ ठरत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक युवकांनी सामाजिक परिवर्तनाची वाट धरली आहे. या उर्जेला स्वस्त धान्य पान 3 वर

# एकच मिशन एसटी आरक्षण

## :- विकास बंजारा यांनी केले बंजारा समाजाला आव्हान



रेणापूर प्रतिनिधी :- बंजारा समाजाला हैदराबाद गॅजेट नुसार एसटी आरक्षण मिळावे या कारणासाठी संघर्ष योद्धा विजय भाऊ यांनी आज सात दिवसापासून हे बेमुदत आमरण उपोषणासाठी बसलेले आहेत उपोषणकर्त्याची तबीयत तबियत दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे. तरी परंतु शासन दरबारी मग ते केंद्रशासन असो किंवा राज्य शासन यांच्याकडून कसलीच दखल घेतली जात नाही यामुळे बंजारा समाज अतिशय टोकाची भूमिका घेण्याच्या मार्गावर येत आहेत.

बेमुदत अमरण उपोषण

आज दिवस-7 वा.तरी शासन झोपेतच का झोपेच सोंग घेत आहे का ? बंजारा समाजाचा अंत पाहू नका.. असे अनेक उद्गार बंजारा समाजातील कार्यकर्त्याकडून आणि बंजारा समाजामधून निघत असलेले दिसून येत आहे तेव्हा प्रसारमाध्यमाच्या माध्यमातून आम्ही शासनास पुन्हा विनंती करीत आहेत की आमचे हक्क आम्हाला द्यावे अन्यथा संघर्षाला सामोरे जावे.

आता गोरमाटी जागा झालेला आहे

तात्काळ बंजारा समाजाला हैदराबाद गॅजेट लागू करून st प्रवर्गा मध्ये समावेश करा...

जालना येथे जाण्याची रुपरेषा विकास बंजारा गजेंद्र चव्हाण प्रदीप मिटाराम राठोड मनोज मिठाराम राठोड रवी चव्हाण अनेक कार्यकर्ते एकत्र येऊन रुपरेषा ठरविले आहे ती खालील प्रमाणे

*"जागो गोरमाटी"*

दि-25/10/2025 रोजी

जालना येथे जेल-भरो आंदोलन होणार आहे तरी समाज बांधवानी उपस्थितीत राहावे.

दि-25-10-25 रोजी सकाळी, पहाटे/6:00 रेणापूर फाटा येथून निघायचं आहे...

*रेणापूर तालुक्यातून प्रत्येक तांड्यातून 1 गाडी निघेल असं नियोजन करावं-आपण जास्तीत जास्त संख्येने जायचं आहे..*

"अभी नही तो कभी नही "

सकल बंजारा समाज-रेणापूर तालुका जिल्हा-लातूर

# जपानमध्ये लिंग समानतेकडे वाटचाल: सनाई ताकाइची — पहिल्या महिला पंतप्रधान



डॉ. भारत कऱ्हाड

2025 साली जपानने आपल्या लोकशाही इतिहासात एक ऐतिहासिक क्षण अनुभवला. सनाई ताकाइची या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून निवडल्या गेल्या आणि त्यामुळे जपानच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाला नवे वळण मिळाले. पुरुषप्रधान राजकारण, पारंपरिक समाजरचना आणि शतकानुशतकांच्या लिंग भेदभावावर मात करत एका महिलेला सर्वोच्च नेतृत्वाचे पद मिळाले, हा क्षण जपानी लोकशाहीच्या प्रगल्भतेचा आणि बदलाच्या स्वीकाराचा पुरावा ठरतो.

जपानचा राजकीय इतिहास पाहिला तर महिलांचे प्रतिनिधित्व नेहमीच मर्यादित राहिले आहे. 1947 च्या संविधानाने समानतेचा अधिकार दिला असला तरी संसदेमध्ये महिलांचा वाटा केवळ 20 टक्क्यांच्या आसपास होता. लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (एलडीपी) या दीर्घकाळ सत्ताधारी पक्षात महिलांना नेतृत्वाचे स्थान मिळणे अत्यंत दुर्मिळ होते. अशा पार्श्वभूमीवर शिगेरु इशिबा यांच्या राजीनाम्यानंतर ताकाइची यांनी घेतलेली धुरा केवळ सत्तांतर नव्हे, तर जपानच्या सामाजिक मानसिकतेत झालेल्या आमूलाग्र बदलाचे प्रतीक ठरते.

सनाई ताकाइची यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी आहे. 1993 मध्ये संसदेत पदार्पण करून त्यांनी जवळपास तीन दशकांची कारकीर्द घडवली. आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रातील त्यांच्या निर्णयक्षमतेमुळे आणि धोरणात्मक विचारसरणीमुळे त्यांना 'आयरन लेडी ऑफ जपान' ही उपाधी मिळाली. शिन्जो आबे यांच्या मंत्रिमंडळात आर्थिक सुरक्षा मंत्री म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. पुराणमतवादी दृष्टिकोन असतानाही त्यांनी जपानच्या सामाजिक रचनेत महिलांच्या सहभागाला नवे स्थान मिळवून दिले. आर्थिक सुरक्षेला लिंगसमानतेच्या चौकटीत बांधण्याचा त्यांचा प्रयत्न हा जपानसारख्या पारंपरिक समाजात एक मोठा बदल मानला जातो.

ताकाइची यांच्या निवडीमुळे जपानमधील महिलांसाठी एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. कॉर्पोरेट क्षेत्र, प्रशासन आणि शिक्षण या सर्वच क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व असलेल्या समाजात महिलांनी नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारावी, हा संदेश त्यांच्या निवडीमधून मिळतो. ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्स 2024 नुसार जपानचा क्रमांक 125वा होता. त्या पार्श्वभूमीवर ताकाइची यांचे पंतप्रधानपद म्हणजे समाजातील 'ग्लास सीलिंग' फोडण्याचा प्रयत्न आहे. हा केवळ प्रतीकात्मक बदल नाही; तो एका मानसिक परिवर्तनाची सुरुवात आहे, जिथे महिलांचा आवाज केवळ ऐकला जात नाही तर स्वीकारला जातो.

या घटनेचा भारताशीही अप्रत्यक्ष पण खोल संबंध आहे. भारत आणि जपान दोन्ही आशियातील लोकशाही मूल्यांचे प्रतीक देश आहेत आणि दोघांनाही लिंग समानतेच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. भारतात इंदिरा गांधींनी दाखवलेला नेतृत्वाचा आदर्श आज जपानमध्ये ताकाइची यांच्या रुपात पुनःप्रकट झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत करत भारत-जपान संबंध अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. दोन्ही देशांनी जी 20 मंचावर महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य दिले असून, ताकाइची यांचे नेतृत्व या सामायिक दृष्टीकोनाला अधिक बळ देईल.

ताकाइची यांच्या समोर मात्र अनेक आव्हाने उभी आहेत. येन चे अवमूल्यन, वाढती महागाई, आर्थिक मंदी आणि वृद्धत्वाकडे झुकणारी लोकसंख्या या जपानच्या प्रमुख आर्थिक व सामाजिक समस्यांचा भार त्यांच्या सरकारवर असेल. त्याचबरोबर महिलांसाठी समान वेतन, सुरक्षित कार्यस्थळे, आणि रोजगाराच्या संधी वाढविणे ही त्यांच्या समोरची मोठी जबाबदारी असेल. "Gender Inclusive Economy" हा शब्द त्यांच्या शासनाचा पाया ठरेल का हे पुढील काही वर्षांत स्पष्ट होईल.

त्यांच्या नेतृत्वाचा शैक्षणिक अर्थही महत्त्वाचा आहे. त्यांच्या निवडीमुळे विद्यार्थ्यांना समाजातील संरचनात्मक अडथळ्यांचा अभ्यास करता येईल आणि लोकशाहीतून बदल कसे घडवता येतात हे समजेल. जेंडर मेनस्ट्रीमिंग, विमेनॉमिक्स आणि रिप्रेझेंटेशन थियरी या संकल्पना आता प्रत्यक्ष राजकारणाच्या प्रयोगशाळेत तपासल्या जातील. ताकाइची या केवळ नेत्या नाहीत, तर महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा एक अभ्यासविषय आहेत.

या घटनेतून एक महत्त्वाचा निष्कर्ष स्पष्ट होतो — समाजातील परिवर्तन हे केवळ घोषणांनी होत नाही, तर शिक्षण, सातत्य आणि संघर्षाच्या माध्यमातून घडते. ताकाइची यांची निवड जपानच्या महिलांसाठी प्रेरणादायी आहे, परंतु त्याहून अधिक ती एक सामाजिक जबाबदारी आहे — की समानतेच्या दिशेने उचललेले पाऊल मागे फिरु नये.

जपानने इतिहास रचला आहे, परंतु खरी परीक्षा आता भविष्याच्या पिढ्यांची आहे — त्या या बदलाला किती पुढे नेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ताकाइची यांचे नेतृत्व 21व्या शतकातील आशियाई समाजाला दाखवते की परंपरा आणि प्रगती यांचा संघर्ष नव्हे, तर संतुलन साधणेच खरी प्रगती आहे.

एकूणच, सनाई ताकाइची यांची निवड ही केवळ जपानच्या इतिहासातील एक घटना नसून परिवर्तनाच्या नव्या युगाची सुरुवात आहे. या निवडीमुळे जगभरातील महिलांना आत्मविश्वासाचा नवा धागा मिळाला आहे. समानतेच्या या प्रवासात जपानने दाखवलेली दिशा प्रेरणेचा दीप ठरावी — कारण खरा विकास तोच जो स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान संधी देतो.


**डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# गोपाळपुर ग्रामपंचायतचे लोकप्रिय सरपंच श्री राजेश सोणवने आदर्श व्यक्तिमत्व



धारूर ( बाबुराव तिडके ) ग्रुप ग्रामपंचायत गोपाळपुर गावचे सरपंच श्री राजेश सोणवने हे सरपंच झाल्यापासून गोपाळपुर सह या गावाखाली येणाऱ्या गावासह वस्त्यांचा त्यांनी विकास केलेला आहे गोपाळपुर गावामध्ये चांगल्या दर्जाचे रस्ते स्वच्छता पाणी पथदिवे घरकुले विंधन विहिरी निराधारांसाठी गाव पातळीवर कामे करून देणे शाळा सुधारणे व शासकिय योजनांचा फायदा नागरिकांना करून देणे या विषयालाच त्यांनी हात घातल्यामुळे गोपाळपुरचे विकास करणारे लोकप्रिय सरपंच म्हणुन धारूर तालुक्या मध्ये विशेष ओळख आपल्या हातुन चांगले कोणाचे नाही झाले तरी चालेल पण वाईट होणार नाही याची काळजी ते घेतात गरिब सामान्य माणसाच्या संपर्कात राहुन तालुक्याच्या ठिकाणी त्यांचे काम करून देण्याची किमया सरपंच श्री राजेश सोणवने यांची लयभारी असते

# अक्षय मुंदडा जो निर्णय देतील तो मान्य - सुनील घोळवे



केज प्रतिनिधी: प्रकाश मुंडे मुंदडा घराण्याचे कट्टर समर्थक आणि एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे सुनील घोळवे यांनी आगामी जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती निवडणुकांसंदर्भात मोठे वक्तव्य केले आहे. "आमचे नेते अक्षय भैय्या मुंदडा जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती निवडणूक लढवण्यासाठी जो निर्णय देतील, तो मला मान्य असेल," असे मत सुनील घोळवे यांनी व्यक्त केले.

सुनील घोळवे हे या भागातील मुंडेवाडीचे रहिवासी आहेत आणि गेल्या तब्बल 17 वर्षांपासून ते मुंदडा घराण्याशी एकनिष्ठेने जोडले गेले आहेत. ते सामाजिक तसेच राजकीय घडामोडींमध्ये अक्षय मुंदडा यांच्या सोबत सक्रियपणे कार्य करतात.

सध्याच्या आरक्षणानुसार, नांदूर सर्कल हे ओबीसी महिलांसाठी राखीव आहे, तर शिरुर पंचायत समिती ओबीसी पुरुषांसाठी राखीव सोडले आहे. या पार्श्वभूमीवर सुनील घोळवे यांनी दिलेले हे मत राजकीय वर्तुळात महत्त्वाचे मानले जात आहे. घोळवे यांनी आपला संपूर्ण विश्वास आणि पुढील वाटचाल अक्षय मुंदडा यांच्या निर्णयावर अवलंबून असेल हे स्पष्ट केले आहे.

# कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव

## (25 ऑक्टोबर: आंतरराष्ट्रीय कलाकार दिन.)

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन- इंटरनॅशनल आर्टिस्ट डे दरवर्षी 25 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते. कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख आपल्या सेवेशी सादर.... संपादक.

या दिवशी, कलाविश्वातील विविध उपक्रम राबवले जातात, जसे की कला प्रदर्शनं, कार्यशाळा आणि चर्चासत्रं, ज्यामध्ये नवोदित आणि अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळते. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आणि समाजातील कलात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो.

कलाकार म्हणजे कला निर्माण करणे, कलेचा सराव करणे किंवा कला प्रदर्शित करणे याशी संबंधित क्रियाकलापात गुंतलेली व्यक्ती होय. सर्वात सामान्य वापर- रोजच्या भाषणात आणि शैक्षणिक प्रवचनात फक्त व्हिज्युअल आर्ट्समधील अभ्यासकाला संदर्भित करतो. सेंट जस्टिनियन, वेल्स, सन 2021मध्ये कामावर असलेला चित्रकार

तथापि, हा शब्द मनोरंजन व्यवसायात देखील वापरला जातो, विशेषतः व्यावसायिक संदर्भात, संगीतकार आणि इतर कलाकारांसाठी जरी कमी वेळा अभिनेत्यांसाठी योजला जातो. आर्टिस्ट, फ्रेंच हा या संदर्भात इंग्रजीमध्ये वापरला जाणारा एक प्रकार आहे, परंतु, हा वापर दुर्मिळ झाला आहे. लेखकांचे वर्णन करण्यासाठी "कलाकार" या शब्दाचा वापर वैध आहे, परंतु सामान्य आहे आणि मुख्यतः समीक्षकांच्या पुनरावलोकनांसारख्या संदर्भांपुरता मर्यादित आहे; त्याऐवजी "लेखक" वापरला जातो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन 25 ऑक्टोबर रोजी कलाकारांचा आणि त्यांनी केलेल्या सर्व योगदानांचा सन्मान केला जातो. दि.25 ऑक्टोबर 1881 रोजी जन्मलेल्या पाब्लो पिकासो या सर्वात प्रसिद्ध कलाकारांपैकी एक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. कलाकार आपली कला निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घेतात. ते आपल्या सभोवतालच्या जगाला सौंदर्य जोडतात. बहुतेक कलाकार अनेक वेगवेगळ्या माध्यमांसह काम करतात. इतकेच नाही तर कलाकार या शब्दात चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार, संगीतकार, नर्तक, लेखक, अभिनेते, डिजिटल कलाकार आणि बरेच काही समाविष्ट आहे. जेव्हा एखादी सर्जनशील भेट घेऊन जन्माला येते, तेव्हा ती सर्जनशीलता विविध क्षेत्रांमध्ये वाहते. उदाहरणार्थ, पिकासो एक चित्रकार, शिल्पकार, सिरेमिकिस्ट, कवी आणि नाटककार होता. लिखित कामांच्या खूप आधी कला आली. काळाच्या सुरुवातीपासून कलेने कल्पनांचा संवाद साधला आहे आणि महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी ठेवल्या आहेत. कला भूतकाळाशी जोडणी देते. कलाकार आपला इतिहास अमिटपणे नोंदवतात. ते सत्यही शोधून काढतात. त्यांच्या कार्याद्वारे ते कथा सांगतात आणि परंपरा पार पाडतात. कलाकारांकडे त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी जोडण्याचा एक अनोखा मार्ग असतो. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात, आशेचा संदेश देणे ही त्यांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.

जागतिक कला दिवस - 15 एप्रिल रोजी साजरा करतात, तर आंतरराष्ट्रीय कलाकार दिन कसा साजरा करायचा- जगभरातील अनेक संस्था आंतरराष्ट्रीय कलाकार दिनाचे समर्थन करतात. यापैकी काहींमध्ये मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, आर्ट गॅलरी ऑफ ओंटारियो, नॅशनल गॅलरी ऑफ स्कॉटलंड, जेरुसलेम फाउंडेशन आणि इतर अनेकांचा समावेश आहे. स्थानिक कलाकारांना साजरे करण्यासाठी, व्हाईट रॉक, ब्रिटिश कोलंबिया आणि सॅन मिगुएल, स्पेन सारखी अनेक शहरे ललित कला महोत्सव आयोजित करतात. जगभरातील गॅलरी ओपन हाऊस होस्ट करतात आणि लोकांना त्यांची कला विनामूल्य किंवा सवलतीच्या दरात पाहण्यासाठी आमंत्रित करतात. आंतरराष्ट्रीय कलाकार दिनात आपण सहभागी होऊ ईच्छिता तर- आपण कोणत्या प्रकारचे कलाकार आहात हे ठरवण्यासाठी ऑनलाइन क्विझ करावे. उपाशी असलेल्या कलाकाराला जेवणासाठी बाहेर काढावे. आपल्या घरासाठी नवीन पेंटिंग खरेदी करावी,आर्ट गॅलरीला भेट द्यावी. सिम्फनीमध्ये सहभागी व्हा. कला वर्गांसाठी साइन अप करा. ते पुस्तक लिहायला सुरुवात करा. वाद्य कसे वाजवायचे ते शिका. प्रतिभा शो स्पर्धा प्रविष्ट करा.

आपल्या स्थानिक कलाकारांना सपोर्ट करा. सर्जनशीलतेची देणगी असलेल्या मुलाला प्रोत्साहित करा. एक स्क्रॅपबुक एकत्र ठेवा. सर्जनशीलता आपल्या आजूबाजूला आहे, याचा अर्थ असा आहे की आपण प्रत्येक दिवस साजरा करु शकतो. फक्त आपल्या फोनने फोटो काढणेही एक कला आहे. आपण तो साजरा करण्यासाठी काहीही करत असतो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिवसाचा इतिहास: कॅनेडियन कलाकार, ख्रिस मॅक्क्लूर यांनी सन 2004मध्ये आंतरराष्ट्रीय कलाकार दिन सुरु केला. तेव्हापासून 25 ऑक्टोबर हा दिवस कलाकारांनी समाजासाठी दिलेल्या सर्व योगदानांचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित आहे.

!! जागतिक कलाकार दिनाच्या समस्त कलावंत आणि कलाप्रेमींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- 9423714883.**

# केज-अंबेजोगाई मतदारसंघात जलक्रांती घडवणाऱ्या अभियंता पाठकसाहेबांचा गौरव; ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते सत्कार

प्रकाश मुंडे/ बीड जिल्हा प्रतिनिधी स्व. डॉ. विमलताई मुंदडा आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आदरणीय नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली केज, अंबेजोगाई मतदारसंघात अनेक साठवण तलावांच्या निर्मितीसाठी मोलाचे योगदान देणारे निष्ठावान आणि कर्तव्यदक्ष अभियंता श्री. पाठकसाहेब यांचा नुकताच गौरव करण्यात आला. तलावांच्या निर्मितीसाठी आवश्यक सर्वेक्षण करून त्यांच्या मंजुरीसाठी स्व. विमलताई मुंदडा यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून परिसरातील शेतकरी बांधवांच्या जीवनात 'जलक्रांती' घडवणाऱ्या या अभियंत्याचा सत्कार भाजप नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

अक्षय निवास अंबेजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी यांच्या हस्ते अभियंता श्री. पाठकसाहेब यांचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी युवा नेते मा. अक्षयभैय्या मुंदडा आणि प्रकाश बोरगावकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा यांनी अभियंता पाठकसाहेब यांच्या कार्याचा गौरव केला. "स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांच्या दूरदृष्टीला अभियंता पाठकसाहेबांच्या तळमळीच्या परिश्रमाची जोड मिळाली. त्यामुळेच आज केज मतदारसंघातील अनेक गावांमध्ये दुष्काळ हटवून शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटण्यास मदत झाली आहे. परिसरातील शेतकरी पाठकसाहेबांच्या या अमूल्य योगदानाला कधीही विसरणार नाहीत," असे भावोद्गार मुंदडा यांनी काढले.

या सत्कारामुळे अभियंता पाठकसाहेबांच्या अनेक वर्षांच्या निष्ठावान सेवेला योग्य तो सन्मान मिळाल्याची भावना भाजप कार्यकर्ते आणि शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा संपन्न

## » 20 वर्षानंतर गत आठवणींना मिळाला उजाळा



वडवणी | प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्वीच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की,महाराणी ताराबाई कन्या शाळेतील शैक्षणिक वर्ष - 2004-05 मधील एस.एस.सी. बॅच च्या माजी विद्यार्थिनींचा शुक्रवार दि. 24 ऑक्टोबर 2025 रोजी तब्बल 20 वर्षानंतर महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्नेह मेळाव्याचे (गेट-टुगेदर) आयोजन श्रीमती अंजली आंधळे यांनी केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून वडवणी पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.सुलोचना आंधळे,विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती एस.के आंधळे /डोईफोडे, सेवानिवृत्त प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,श्री. धस सर , श्री.डोईफोडे सर,श्री.चोले सर,श्री. घोळवे सर,श्रीमती जवंजावळ मॅडम ,श्रीमती फलके मॅडम अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते मान्यवरांवर पुष्पवृष्टी करून माजी विद्यार्थिनींनी स्वागत केले.

मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

रोहिणी शिनगारे,अंजली मस्के,आम्रपाली मस्के,अश्विनी वखरे यांनी स्वागतगीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले.

आम्रपाली मस्के,रोहिणी रावदाने, सीमा जाधव,रोहिणी अंकुशे,आशा आळणे या माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर ,श्रीमती जवंजावळ मॅडम श्रीमती फलके मॅडम,श्री.डोईफोडे सर ,प्राचार्या शोभाताई आंधळे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की, प्रामाणिकपणे वागणाऱ्या व्यक्तींना जीवनात त्रास होतो हे खरे आहे पण आत्मिक समाधान त्यांना मिळत असते प्रामाणिकपणे राहिलो म्हणूनच मी आमदार झालो असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थिनींना केले.

गेट-टुगेदर चा कार्यक्रम दोन सत्रामध्ये संपन्न झाला दुसऱ्या सत्रात संगीत-खुर्ची,तळ्यात- मळ्यात हे खेळ खेळण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती काळे,सरिता माळवदे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक रोहिणी शिनगारे व कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार अंजली आंधळे यांनी मानले.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

नागपूरमधील एका कार्यक्रमात जाहीरपणे बोलून दाखवल्या. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना जपा असे त्यांनी भाजप नेतृत्वाला बजावले आहे.

घर की मुर्गी दाल बराबर बाहेरुन आलेले सावजी चिकन' असा टोलाच त्यांनी या कार्यक्रमात हाणला. सावजी असल्याने बाहेरचा चिकन मसाला चांगला लागतो. पण जुन्या लोकांकडे लक्ष ठेवा. हे जोपासलेले कार्यकर्ते आहेत. त्यांची कदर करा. त्यांना जपा. नाहीतर जेवढ्या जोराने वरच्या दिशेने जात आहात, तितक्याच झपाट्याने खाली आपटला असा खणखणीत इशारा त्यांनी भाजप नेतृत्वाला दिला. यावेळी मंचावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी आमदार सुधाकर कोहळे, डॉ. राजू पोतदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर येथील रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात नितीन गडकरी यांनी दमदार भाषण केले. गडकरी हे त्यांच्या रोखठोक भूमिकेसाठी ओळखल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जिंकण्याचा चंग सध्या भाजपने बांधला आहे. मुंबई महापालिकेसह राज्यातील जिल्हा परिषद आणि महापालिकेवर त्यांना कमळ फुलवायचे आहे. त्यासाठी भाजपमध्ये स्थानिक नेते येण्यास इच्छुक आहे. त्यांच्यासाठी भाजपने सताड दार उघडं केल्याने जुन्या जाणत्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना असुरक्षित वाटत आहे. सोलापूरच नाही तर अनेक ठिकाणी या इनकमिंगविरोधात स्थानिक नेते आणि कार्यकर्ते संताप व्यक्त करत आहेत. नेमकी हीच भावना नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

----------------------------------------

मुलाखतीस उपस्थित रहावे, असे आवाहन परळी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

----------------------------------------

समितीचे सदस्य, नगरसेवक, विविध संस्थांचे संचालक, लोकप्रतिनिधी, सरपंच, चेअरमन तसेच बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख, विविध आघाड्यांचे पदाधिकारी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. स्नेह मिलन कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपच्या वतीने करण्यात आले आहे.

••••

----------------------------------------

आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यास सांगितले. त्यानंतर बच्चू कडू यांनी विदर्भात कर्जमाफीसाठी पदयात्रा सुद्धा काढली. या यात्रेत त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. कर्जमाफी किती गरजेची आहे ते पटवून दिले. आता अतिवृष्टीने राज्यातील 29 जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. पण भरीव मदत अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. तर सरकारला कर्जमाफीचा विसर पडू नये यासाठी बच्चू कडू पुन्हा मैदानात उतरले आहेत. या महिन्याच्या अखेरीस ते आंदोलनाचा पुकारा करतील.अमरावतीत प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यावर निशाणा साधला. मुख्यमंत्र्याचं प्रतिकात्मक कार्टून बच्चू कडू यांनी सोशल मीडियावर व्हायरल करत त्यांनी टीका केली. त्यांची ही पोस्ट सध्या समाज माध्यमात व्हायरल झाली आहे. "फडणवीस साहेब किती दिवस दिलेला शब्द तोंडात धरून बसणार? राज्याच्या शेतकऱ्यांचा संयम आता संपत चाललाय" असा टोला बच्चू कडू यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला आहे.

----------------------------------------

पहिला मोर्चा असल्याचा दावा वंचितचे नेते सुजात आंबेडकर यांनी केला.

शैक्षणीक संकुलात वैचारीक संघटनांची नोंदणी कशासाठी जर असे असेल तर संघाच्या नोंदणी प्रमाणपत्र दाखवा असे आव्हान त्यांनी दिले. या वेळी क्रांती चौकापासून ' आरएसएस' मुर्दाबाद'च्या घोषणांनी परिसर दणाणला.शहरातील देवगिरी महावद्यालयासह विविध ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्यात आले होते. यातील एका महाविद्यालयासमोरील सदस्यता नोंदणीला विरोध करण्यात आला. राहुल मकासरे आणि विजय वाहुळ कार्यकर्त्यांवर पोलिसांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांमध्ये रोष होता. समाजमाध्यमांमधून तो व्यक्त केला जात असताना वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रा. स्व. संघ कार्यालयावर शुक्रवारी मोर्चा काढण्याचे ठरविण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कोणत्याही स्वरुपाची तक्रार नसताना पोलिसांनी स्वतः तक्रार दाखल केली.दुपारी बाराच्या दरम्यान सुजात आंबेडकर, सिद्धार्थ मोकळे, अमित भुईगळ आदी नेत्यांच्या उपस्थितीमध्ये क्रांती चौकातून मोर्चास सुरूवात करण्यात आली. या वेळी रा. स्व. संघ संविधान विरोधी असून त्यांना तिरंगा आणि संविधान भेट देण्यासाठी मोर्चा काढण्यात आल्याचे सुजात आंबेडकर यांनी सांगितले. हा मोर्चा काही अंतरावर गेल्यानंतर जिल्ह्या बँकेच्या अलिकडे पोलिसांनी अडवला. या वेळी रा. स्व. संघाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.मोर्चात सहभागी नेत्यांचे एक शिष्टमंडळ तिरंगा ध्वज, संविधानाची प्रत घेऊन रा. स्व. संघ कार्यालयापर्यंत गेले. शहरातील प्रल्हाद भवन या रा. स्व. संघाच्या इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने येथे कोणीही नसते असे शिष्टमंडळास पोलिसांनी सांगितल्याची माहिती सुजात आंबेडकर यांनी मोर्चाच्या समारोप प्रसंगी दिली. रा. स्व. संघाच्या विरोधात केवळ आंबेडकरी जनताच उभा राहू शकते, असा संदेश देशभरात नव्हे तर रा.स्व. संघाचे काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कार्यकर्त्यांपर्यंत पोहचल्याचे सांगत मोर्चा यशस्वी झाल्याचा दावा या वेळी करण्यात आला.

' मनुवाद पसरायला नको म्हणून त्यांना नोंदणी करायला आम्ही नकार दिला होता. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा फलक काढायला भाग पाडले होते. नोंदणी करणाऱ्या या संघटनेची नोंदणी कुठे आहे, असा सवाल या वेळी करण्यात आला. तिरंगा आणि संविधानाची प्रत स्वीकारायला ' आरएसएस' चा कोणी प्रतिनिधी पुढे आला नाही म्हणजे त्यांनी त्याचा अपमानच केला असल्याचा आरोप या वेळी सुजात आंबेडकर यांनी केला. या मोर्चामुळे शहरातील विविध चौकात शुक्रवारी मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला.

----------------------------------------

शुभारंभ शुक्रवार दिनांक 24 ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी खासदार रजनीताई पाटील आणि माजी मंत्री अशोकराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रविकिरण इंगळे दांपत्याच्या हस्ते पूजा करुन गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी खा.रजनीताई पाटील यांनी कारखाना चालवताना जो संघर्ष करावा लागला त्याबद्दल माहिती दिली. तसेच, राहुल सोनावने यांची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगत, ते आता एक महत्त्वाची लढाई लढणार आहेत, त्यासाठी आपल्या सर्वांची साथ मिळावी अशी अपेक्षाही व्यक्त केली.

माजी मंत्री अशोकराव पाटील यांनी बोलताना सांगितले की, अनेक जण कारखाना ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करत होते, मात्र आम्ही लक्ष्मण मोरे यांच्या हातात कारखाना दिल्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. शेतकऱ्यांच्या विश्वासावर कारखाना दिमाखात सुरु झाला असून, यात अनेकांनी आर्थिक अडवणूक करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचे मनसुबे धुळीस मिळाले. गंगा माऊली शुगर उत्तरोत्तर प्रगती करत असल्याने आमचे सर्व स्वप्न पूर्ण होताना दिसत आहेत. हा कारखाना उच्चांकी भाव देण्याचा विक्रम करेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यकारी संचालक प्रवीण मोरे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, गंगा माऊली शुगरने टनामागे एफआरपी पेक्षा शंभर रुपये जास्त दिले असून, डिस्टलरी प्रकल्प उभारणीचे कामही सुरू आहे. रजनीताई आणि दादांचा विश्वास तर लाभलाच, मात्र सूत्र जुळवण्यासाठी राहुल सोनवणे यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत लवकरच एआय तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे नमूद केले.

बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी बोलताना सांगितले की, या परिसरातील एक साखर कारखाना उभा राहावा यासाठी खासदार रजनीताई पाटील आणि अशोक पाटलांनी 33 वर्षांपूर्वी स्वप्न बघितले होते. चेअरमन लक्ष्मण मोरे हे लातूर पॅटर्नचे जनक आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणणे हेच आमचे ब्रीदवाक्य असून, त्याप्रमाणे आम्ही कारखाना चालवत आहोत. सर्वात जास्त भाव देणारा कारखाना म्हणून गंगा माऊली शुगर पुढे येत आहे. कुठल्याही शेतकऱ्यांनी उसाची चिंता न करता नोंदणी प्रमाणे ऊस गाळपाची सर्वस्वी जबाबदारी आम्ही घेतली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख यांनी गंगा माऊलीच्या माध्यमातून प्रत्येकाच्या घराघरात विकासाची गंगा पोहोचली असून, मराठवाड्यात उसाचा भाव काय असावा हे गंगा माऊली ठरवेल, असे मत व्यक्त केले. आदित्य पाटील यांनी सांगितले की, पाटील दाम्पत्याने कारखाना पुनर्जीवित करण्याचा निर्धार करून लक्ष्मणराव मोरे यांच्याकडे सुपूर्द केला. आम्ही आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि यात राजकारणही करणार नाही, त्यामुळे आपल्याला भयमुक्त कारखानदारी नक्कीच जाणवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी बोलताना सांगितले की, तीन वर्षे गाळप यशस्वीपणे पूर्ण केले असून, सर्वांचे पेमेंटही वेळेवर दिले आहे. पंधरा दिवसात पेमेंट देण्याचा पायंडा गंगा माऊली शुगरने पाडला आहे. वेळेवर पेमेंट देऊन आणि शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवून शेतकऱ्यांची कधीच हेळसांड होऊ देणार नाही. उसाला भाव देण्याची आपल्याशी कुणीही स्पर्धा करु शकणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कारखान्याच्या यशस्वी शुभारंभाचे खरे श्रेय राहुल सोनवणे यांचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी ऊस उत्पादनामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या, वाहतुकीमध्ये चोख कामगिरी बजावलेल्या तसेच ऊसतोड कामगारांमध्येही असाधारण कार्य केलेल्या सर्व घटकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले, तर आभार मुजावर शेख यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

----------------------------------------

जिल्हा आशा वर्कर्स यूनियन, लाल बावटा घरकामगार संघटन, लाल बावरा विविध कामगार युनियन व शालेय पोषण आहार संघटना याचा समावेश आहे. सर्व संघटनाचे मिळून 140 प्रतिनिधी अधिवशनास उपस्थित रहाणार आहेत. कामगारापूढील प्रश्नावर चर्चा होउन पूढील तीन वर्षान करावयाची कामाची चर्चा होऊन पुढील लीन वर्षात काम करणारी कार्यकारिणी निवडली जाईल. संघटनेचे निवड झालेले प्रतिनिधी यांनी 25 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.30 वाजता परळी येथील जाजूवाडी विठ्ठल मंदिरात पोहच व्हावे असे आवाहन संघटनेकडून करण्यात आले आहे.

----------------------------------------

लढवणार असुन त्यांना निश्‍चित विजयश्री मिळेल. अशी चर्चा होतांनादिसत आहे. टोकवाडी पंचायत समिती गाणातील सदस्यपदाची निवडणूक रतन रोडे हे लढविणार असल्याचे ठाम आहे. त्यांच्या नावाची गणात जोरदार चर्चा आहे.

----------------------------------------

दुकानदार संघटना परळी तालुकाध्यक्ष म्हणून चांगले काम करुन दाखवले आहे.चे नेते स्वर्गीय उध्दव बापु मुंडे यांच्या सुनबाई आहेत. सौ. संतोशिला बालाजी मुंडे यांनी आपुलकीचा स्पर्श देत 'सेवा आणि विकास' यांचा संगम साधण्याचा संकल्प केला आहे.

"वार्ड क्रमांक 14 मधील प्रत्येक नागरिक हा माझ्या कुटुंबाचा एक भाग आहे. त्यांच्या अडचणी, त्यांच्या गरजा आणि त्यांच्या स्वप्नांना न्याय देण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक घरापर्यंत पोहोचविणे, हेच माझं ध्येय आहे," असे भावनिक उद्गार सौ. मुंडे यांनी व्यक्त केले.

दरम्यान, परळीच्या नगरपरिषदेतील ही निवडणूक केवळ राजकारणाची नव्हे, तर समाजसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरेल, असा विश्वास येथीलस्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

----------------------------------------

फेलोशिप योजना सुरु करण्यात आल्या.यामध्ये विद्यार्थ्यांना बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व आर्टी संस्थांच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. मात्र मागील दोन वर्षांपासून सरकारकडून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच देण्यात आलेली नाही. राज्यातील जवळपास 100 हून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. यापैकी अनेक विद्यार्थी हे पीएच.डी प्रवेश परीक्षेमध्ये अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.शिष्यवृत्ती मिळावी यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी दोन वर्षांपासून सातत्याने सरकारला निवेदने देऊन पाठपुरावा केला. मात्र सरकारकडून त्यावर कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने विद्यार्थ्यांनी 13 ते 17 ऑक्टोबरदरम्यान आझाद मैदानात आंदोलन केले. मात्र या आंदोलनादरम्यान कोणत्याही अधिकारी व नेत्यांनी संवाद न साधता दुर्लक्ष केल्याने विद्यार्थ्यांच्या संतापात भर पडली आहे.दरम्यान आझाद मैदानामध्ये आंदोलन करण्यापूर्वी कृषीमधून पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुण्यामध्ये 15 ते 22 सप्टेंबरदरम्यान आठ दिवसांसाठी अन्नत्याग आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय मांडण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी हे आंदोलन स्थगित केले. मात्र राज्यात अतिवृष्टी झाल्याचे कारण पुढे करीत पीएचडी कृषी संशोधक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला.मंत्रिमंडळाच्या चार बैठका होऊनही पीएचडी कृषी शिष्यवृत्तीचा विषय मंत्रिमंडळात मांडण्यात आला नाही, अशी खंत कृषी संशोधक विद्यार्थी समन्वयक कृती समितीचे प्रतिनिधी विश्वजित काळे यांनी व्यक्त केली.

----------------------------------------

त आली असून त्यांच्या नावावर कोणतेही अधिकृत दस्तावेज जारी झाले आहेत का, याची तपासणी करण्यात यावी. तपासणीत तसे आढळल्यास हे दस्तावेज तात्काळ रद्द करण्यात यावेत. तसेच याबाबतचा अहवाल एटीएसकडे पाठविण्यात येणार यावा. दर तीन महिन्यांनी हा अहवाल सादर करण्यात यावा. अनेकदा स्थानिक लोकप्रतिनिधींकडून होणाऱ्या शिफारशींच्या आधारे शिधापत्रिका वितरित करण्यात येत असते. अशा वेळेस अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तसेच त्याच्या राहण्याच्या ठिकाणाची काटेकोरपणे पडताळणी करण्यात यावी, कोणत्याही परिस्थितीत बांगलादेशी घुसखोरांना शिधापत्रिका दिली जाऊ नये, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

## पान 4 वरुन

घेऊन काबाडकष्ट करून, ऊस तोडून लेकरं उच्चशिक्षित करत आहेत. बीडची म्हणून कोणी हिणवत असेल तर ते सगळ्यात मोठ दुर्दैव आहे. आमचे बीडचे लोक बुद्धिमान आहेत आणि सर्व क्षेत्रात पुढे आहेत. या घटनेत जे कोणी खासदार त्यांचे पी ए असतील ते सुद्धा यात आरोपी झाले पाहिजेत. त्या लेकरावरती अत्याचार होत असताना तिने तक्रार दिली होती तिची दखल न घेणारे जे जे कोणी असतील ते या प्रकरणी दोषी आहेत.मी संपदा च्या बाजूने ठामपणे उभा आहे, असं आमदार सुरेश धस यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

----------------------------------------

रोगाचा प्रसार रोखण्यासाठी त्वरित सरकारी हस्तक्षेप, लसीकरण आणि योग्य औषधोपचार आवश्यक आहेत. मात्र, प्रशासनाने अद्याप सावधगिरी बाळगलेली नाही, ज्यामुळे संकट अजूनच गंभीर होत आहे. बंगालीपिंपळा या ठिकाणी 9 पेक्षा अधिक जनावरे दगावली असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या रोगाने जनावरे दगावण्याची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तरी पशुसंवर्धन विभाग अजून किती जनावरे दगावण्याची वाट पाहत आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

----------------------------------------

उपस्थिती पाहायला मिळाली. आरोपीवर कठोरता कठोर कारवाई करण्याची मागणी कुटुंबीयांसह नातेवाईकांनी केली. तरुणीला शोकाकुल वातावरणात अखेरचा निरोप देताना नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळाला. आरोपी प्रशांत बनकरला अटक करण्यात आली आहे, तर पीएसआय गोपाल बदनेचा शोध सुरु आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी त्वरित कारवाईचे आदेश दिल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने यास निलंबित करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले.19 जून रोजी पीडितेने फलटण येथील उपविभागीय पोलिस उपअधीक्षकांना पत्र लिहून आपला छळ होत असल्याची तक्रार केली होती. त्या पत्रात तिने बदनेसह फलटण ग्रामीण पोलिस ठाण्यातील तीन अधिकाऱ्यांकडून मानसिक त्रास आणि दबाव टाकला जात असल्याचा आरोप केला होता.आम्ही या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून एका आरोपीचे नाव पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने आहे. तो फलटण ग्रामीण पोलिस ठाण्यात कार्यरत आहे. दुसरा आरोपी प्रशांत बनकर असून या प्रकरणात आम्ही बदने याला निलंबित करत आहोत. आरोपींना अटक करण्यासाठी पोलिस पथक रवाना करण्यात आले आहे' असे सातारा पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी सांगितले.

----------------------------------------

दिड एकर जमिन आहे.याठिकाणी सोयाबिन पिकांच्या 3 बँगची पेरणी केली होती. यापैकी दोन बँगच्या पिकाची कापणी करुन याच शेतात सोयाबीन झाकून ठेवली होती.

दिनांक 23 ऑक्टोबरच्या मध्यरात्री अज्ञात व्यक्तीने एकत्र करुन व नीटनेटकी झाकून संपूर्ण सोयाबीनला जाळून टाकल्याची प्रकार घडला आहे. ही घटना सकाळी फिर्यादींची बहीण पुष्पा साळवे या शेतात गेल्यानंतर त्यांना समजली. यानंतर त्यांनी भाऊ अडवोकेट सुरेश साळवे यांना कळवले असता. फिर्यादी अडवोकेट सुरेश सोपानराव साळवे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली व सदरील संपूर्ण सोयाबीन अज्ञात व्यक्तीने जाळून टाकल्याचा प्रकार दिसला त्यानंतर साळवे यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन जाऊन अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

----------------------------------------

ज्ञानयज्ञामध्ये साध्वी सुश्री अदिती भारतीजी यांच्याद्वारे श्रीमद् देवी भागवत महापुराणाचे भक्तिभावाने ओथंबलेले निरुपण होणार आहे.

येत्या काही दिवसांत संपन्न होणारा हा ज्ञानयज्ञ निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी आणि अध्यात्मिक उन्नतीचा मार्गदर्शक ठरेल ह्यात शंकाच नाही. अंबाजोगाई शहरासाठी हा उत्सव एक महत्त्वपूर्ण धार्मिक पर्वणी ठरणार आहे.

----------------------------------------

ईश्वर सोनवणे आदी उपस्थित होते .

----------------------------------------

सोन्याच्या काड्या असे दागिने एकूण 27 तोळे 4 ग्रॅम वजनाचे सोन्याचे जुने दागिने ज्याची किंमत 5 लाख 81 हजार 500 रु दागिन्यांची चोरी झाली आहे.बळीराम तांदळे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे तपास करीत आहेत.

----------------------------------------

जात आहे. या घटनेमुळे बँक ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बँक सुरक्षेची जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडण्याची मागणी ग्राहकांकडून केली जात आहे.

----------------------------------------

चौंडे यांनी आभार मानले असुन या शुभेच्छांच्या बळावर आपण आणखी उमेदिने सामाजिक/शैक्षणिक कार्य करु असे त्यांनी म्हटले आहे. वाढदिवाच्या निमित्त सत्कार प्रसंगी श्वासाच्या शेवटच्या क्षणा पर्यत मित्रांचा रुणी राहील व मित्रांनी दिलेल्या शुभेच्छा कदापिही विसरणार नाही असे प्रतिपादन संदीप चौंडे यांनी केले.

----------------------------------------

आहे की, "हैद्राबाद गॅझेट हा समाजाच्या हक्काचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. या गॅझेटनुसार गोरबंजारा समाज हा एसटी प्रवर्गातील आहे. पण प्रशासकीय दुर्लक्षामुळे समाज आजही वंचित आहे. शासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन समाजाला मूळ हक्काचा न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच शासनाने तातडीने तज्ञ समिती स्थापन करून ऐतिहासिक पुराव्यांचा सखोल अभ्यास करावा आणि त्यानुसार गोरबंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्याचा शासननिर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.

दरम्यान,राज्यातील विविध जिल्ह्यांतील गोरबंजारा समाजाचे प्रतिनिधी या मागणीसाठी एकत्र आले असून, आगामी काळात राज्यव्यापी जनजागृती मोहीम आणि आंदोलनाची तयारी सुरु असल्याचे अखिल भारतीय बंजारा क्रांती दल राष्ट्रीय महासचिव शरद भाऊ राठोड यांनी स्पष्ट केले.

गोरबंजारा समाजाला एसटी प्रवर्गातील आरक्षण मिळाल्यास समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास शरदभाऊ राठोड यांनी व्यक्त केला.

----------------------------------------

सहभाग कमी प्रमाणात दिसतो. यामुळे निर्णयप्रक्रियेवर काही मोजक्या व्यक्तींचा प्रभाव राहतो आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या कायम राहतात. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्त्यांची दुरवस्था, अनियमित कामकाज या मुद्द्यांवर नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संदेश आजही तितकाच जिवंत आहे. शिक्षण घेणे पुरेसे नाही, तर त्या शिक्षणाचा उपयोग समाज आणि प्रशासन सुधारण्यासाठी होणे आवश्यक आहे. सुशिक्षित वर्गाने राजकारणात सक्रिय भाग घेतल्यास परळी शहरातील कारभार अधिक पारदर्शक जबाबदार आणि विकासा भिमुख होऊ शकतो.

शहरातील अनेक मतदार आता "बदलाची हाक" देत आहेत. तरुण आणि सुशिक्षित उमेदवारांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या निवडणुकीत मतदारांनी नेत्यांचा चेहरा नव्हे, तर त्यांचा विचार आणि प्रामाणिकपणा पाहणे आवश्यक असल्याचे नागरिक म्हणत आहेत.

परळी वैजनाथ नगरपरिषदेची निवडणूक ही केवळ सत्तासंघर्ष नाही, तर शहराच्या भविष्याचा निर्णय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार लक्षात घेऊन, सुशिक्षित वर्गाने मतदान आणि राजकारणात सहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे.

कारण राजकारणाकडे दुर्लक्ष केल्यास, दुर्लक्षित समाजाला त्याची किंमत मोजावी लागेल

----------------------------------------

नेते सतीश जगताप, मा. नगरसेवक संजय कुकडे, जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मनीष जोशी, पत्रकार संतोष जुजगर, जगन्नाथ पवार, छ. शिवाजी महाराज चौक विभाग प्रमुख संजय सोमाने, मोहन परदेशी,योगेश जाधव, युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन लोढा, नवनाथ वरवटकर, सोमनाथ धोत्रे, शंकर शिंदे, बालू कुराडे, सतीश पवार, प्रकाश देवकर, विद्यार्थी सेना मा.तालुकाप्रमुख अमित कचरे, कारभारी शिंदे,जय महाराष्ट्र प्रतिष्ठानचे सहसचिव योगेश घेवारे, सोमनाथ गायकवाड यांच्यासह शिवसेना व युवा सेनेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अभयकुमार ठक्कर यांनी यावेळी सांगितले की, "शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जयघोष म्हणजे प्रत्येक शिवसैनिकाच्या हृदयातील दीप आहे. त्यांची विचारधारा हीच आमची दीपावली असून, त्यांच्या आशीर्वादानेच महाराष्ट्र उजळला आहे."

या दीपप्रज्वलन सोहळ्यात जय महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी उत्साहात सहभाग घेत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन करत दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

----------------------------------------

आनंद कोकाटे या तरुणाने धनगर एसटी आरक्षणासाठी आपल्या राहत्या घरात पत्र्याच्या शेडच्या अँगलला दोरी बांधून पहाटेच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली.

आंनद कोकाटे यांच्या पश्चात आई,भाऊ,पत्नी,दोन मुली,मुलगा असा परिवार आहे.आंनद यांच्या आत्महत्येने जिल्हाभर,पंचक्रोशीतून,प रिसरातुन, समाजातुन सर्वत्र हळहळ व दु:ख व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेची माहिती मिळताच धनगर समाजाचे नेते प्रकाश भैय्या सोनसळे यांनी मांजरसुंबा येथे कोकाटे कुटुंबाची सांत्वनपर भेट घेऊन कै.आनंद कोकाटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. व कोकाटे परिवाराला असे आश्वासन दिले कै.आनंद कोकाटे यांनी धनगर एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतःचे बलिदान दिले हे बलिदान आम्ही वाया जाऊन देणार नाही असे कोकाटे कुटुंब्यास आश्वासन दिले व हा लढा येथेच थांबणार नाही आम्ही धनगर एसटी आरक्षणाचा लढा हा चालूच ठेवणार आहोत. आणि कोकाटे कुटुंबाच्या पाठीमागे धनगर समाज पूर्णपणे उभा राहील या कुटुंबाला न्याय देईल.

यावेळी किशोर भावले,सूर्यकांतजी कोकाटे, दिगंबरजी चादर, बाबू सोनसळे, दीपक कोकाटे,मन्मथ, शिवराम, चंद्रसेन कोकाटे, अभिजीत भोंडवे आदी उपस्थित हो

----------------------------------------

युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे जिल्हा सचिव एडवोकेट संजय रोडे , जिल्हा उपाध्यक्ष प्रसंजीत रोडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालासाहेब जगतकर वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गौतम साळवे वंचित बहुजन आघाडीचे युवक तालुका अध्यक्ष राजेश सरवदे, युवक तालुका महासचिव ज्ञानेश्वर गीते.ईत्यादिच्या प्रमुख उपस्थित सदरील मुलाखती होणार असून इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर उमेदवारी अर्ज दाखल करावा असे आव्हान वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी शहराध्यक्ष प्रेम जगतकर यांनी केले आहे.

----------------------------------------

# अवकाशाचे आवाहन

आपल्याकडे विज्ञानाबाबतही सगळा वलयाचा मामला. ज्याच्या नावे एकही संशोधन नाही असे, केवळ भाभा अणुसंशोधन केंद्रातील चाकरीची पुण्याई असणारे आणि काही तर केवळ विज्ञानकथा सांगणारे... अशा सगळ्यांनाच येथे वैज्ञानिक म्हटले जाते. कोणालाही विचारवंत असा किताब द्यावा तसेच हे. आणि सध्याचा काळ तर काही सेकंदांच्या 'रील'मध्ये मावणाऱ्या कर्तृत्वाला नमन करण्याचा. दर श्वासागणिक जिथे नवा तारांकित लागतो, तिथे समग्र आयुष्य विज्ञानालाच समर्पित असलेल्यांची कथा सांगणार कोण? आणि सांगितली, तरी या वावदुकी वातावरणात ऐकणार कोण? एखाद्या वाक्याच्या वा मोजक्या शब्दांच्या आत्मचरित्रात विरून जाणाऱ्या 'स्टोरी'इतके भागधेय उरणे, हा केवळ त्या व्यक्तीवर तर अन्याय आहेच; पण तो व्यक्तीला तेवढ्यातच बंदिस्त करणाऱ्यांचा करंटेपणाही. अर्थात, शतायुषी शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांना तर निधनानंतर एवढेही भाग्य अपवादानेच मिळाले असेल. म्हणूनच त्यांची फक्त स्मरणनोंद न लिहिता त्यांची महत्ता सविस्तर सांगायला हवी. भारताच्या अवकाशविज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे चिटणीस यांचे काम ही फक्त त्यांच्या कार्यकर्तृत्वातील एकेका प्रसंगाची गोळाबेरीज नाही, तर तो भारताच्या स्वातंत्र्योत्तर विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा मोठा दस्तावेज आहे, जो उद्याच्या विज्ञानवाटेची दिशा ठरविण्यासाठी धोरणकर्त्यांनीही अभ्यासायला हवा.चिटणीस मूळचे कोल्हापूरचे. शिक्षणासाठी पुण्यात आले. तत्कालीन पुणे विद्यापीठात पदार्थविज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर काही काळ ते गुजरातमधील एका गावात व्याख्याते म्हणून काम करत. ओढा संशोधनाकडे असूनही तो काळ असा की, संशोधनासाठी पुरेशा सुविधा नसल्याने मास्तरकीवाचून गत्यंतर नव्हते. अर्थात, कालांतराने संशोधन सहायक म्हणून काम मिळाले. आणि, मग थेट अमेरिकेत मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात 'एमआयटी'मध्ये त्यांना संशोधनाची संधी मिळाली. रुढार्थाने स्थिरस्थावर झालेले असताना, त्यांना खुद्द विक्रम साराभाईंनी भारतात परतण्यासाठी हाक दिली. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतासमोर भूक, रोगराई, गरिबी या समस्या आ वासून उभ्या होत्या. त्या विज्ञानाच्या मार्गे सोडविण्यासाठी भारतात परत ये, अशी साराभाईंची साद होती आणि त्याला चिटणीसांनी लगेच प्रतिसाद दिला. काही कालावधीत चिटणीस हे इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रीसर्च- 'इन्कोस्पार'चे सदस्य-सचिव झाले. याच 'इन्कोस्पार'चे रूपांतर 1969 मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात 'इस्राो'त झाले. चिटणीस हे त्या अर्थाने 'इस्राो'ची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महत्त्वाच्या वैज्ञानिकांपैकी एक.एमआयटी'तून परत आलेल्या चिटणीसांना साराभाईंनी पहिले काम दिले, ते रॉकेट प्रक्षेपणासाठी भारतात योग्य जागा निवडण्याचे. चिटणीस यांनी पाच महिन्यांच्या अथक शोधानंतर केरळातील तिरुअनंतपुरममधील थुंबा ही पृथ्वीच्या चुंबकीय विषुववृत्तानजीकची जागा त्यासाठी सुचवली. संशोधनासाठी, रॉकेट प्रक्षेपणासाठी हीच जागा उत्तम, यावर बऱ्याच चर्चांनंतर एकमत झाले आणि वर्षभरातच नोव्हेंबर 1963 मध्ये 'नासा'च्या मदतीने, वातावरणाचा अभ्यास करणाऱ्या नाइके-अपाचे या रॉकेटचे येथून प्रक्षेपणही झाले. भारतीय शेतकऱ्यांसाठी हवामान अंदाज देण्यासाठी याचा उपयोग झाला. या रॉकेटचे भाग सायकलींवर आणि बैलगाड्यांतून प्रक्षेपणाच्या ठिकाणी आणण्यात आले होते, हे आज सांगितले, तरी आश्चर्य वाटेल. पण, भारताच्या अवकाश विज्ञानातील भरारीची आस लागलेल्या वैज्ञानिकांच्या दृढनिश्चयी भूमिकेची आणि समर्पित वृत्तीची आठवण करून देण्यासाठी ते पुरेसे ठरावे. थुंबा येथील ही जागा आज विक्रम साराभाई अवकाश केंद्र म्हणून ओळखली जाते. पहिले रॉकेट प्रक्षेपित करण्यासाठी ज्या राष्ट्रांची मदत लागली, त्यांची रॉकेट आज येथून प्रक्षेपित होतात. यातून, 'अवकाशविज्ञानात भारताची झेप प्रचंड असेल,' असे भाकीत चिटणीस यांनी भारताच्या 100 व्या अवकाश मोहिमेवेळी काही वर्षांपूर्वी केले होते, जे प्रत्यक्षात येताना दिसते.विज्ञान संशोधन पुढे जायचे असेल, तर त्यामागे राजकीय नेतृत्व प्रभावीपणे उभे राहण्याची गरज असतेच. चिटणीसांनीच काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत याचे महत्त्व सांगितले होते. त्या वेळच्या

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

शनिवार दि. 25 ऑक्टोबर 2025




# बीड डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणावर सुरेश धस आक्रमक; 'त्या' खासदार आणि पी.ए.ला...



बीड : सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येने खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीने आत्महत्या करण्याआधी हातावर दोघांची नावे लिहिली होतीत. त्यामध्ये प्रकाश बनकर आणि पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने यांची नावे लिहिली आहेत. प्रकाशसोबत तरुणीचं बोलणं झालेलं होतं, त्याला पोलिसांनी पुण्यामधून अटक करण्यात आली आहे. त्यामुळे आत या प्रकरणाबाबत सविस्तर माहिती समोर येईल. अशातच या प्रकरणावर आमदार सुरेश धस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.बीड जिल्ह्याच्या वडवणी येथील डॉक्टर मुलीच्या आई वडिलांनी केवळ तीन एकरावरती तिला डॉक्टर केले. तिच्या आत्महत्येच्या म्हणजे सुसाईड नोट मध्ये हातावरती लिहिलेल्या जे कोणी पोलीस उपनिरीक्षक त्याच्यानंतर तो बनकर हे तर आरोपी झालेच पाहिजेत. परंतु पीडितेच्या तक्रारीची दखल न घेणारे उपजिल्हा रुग्णालयातील जे कोणी अधिकारी जबाबदार असतील हे सगळेच्या सगळे याच्यामध्ये आरोपी झाले पाहिजेत. याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. हे जे सगळे आरोपी आहेत हे सगळेच्या सगळे फासा वरती लटकले पाहिजेत असं माझं मत असल्याचे सुरेश धस यांनी म्हटलं आहेफास्टट्रॅक वरती तर हा खटला चाललाच पाहिजे परंतु एसआयटी ही स्थापना यांच्यामध्ये झाली पाहिजे. पोटाला चिमटा घेऊन आमचे लोक ऊस तोडून लेकीबाळीला शिकवतात आणि त्याचा जर असे काही लोक गैरफायदा घेत असतील तर त्यांना जरब बसली पाहिजे. इथून पुढे दुसरं अशा कोणत्या डॉक्टरसोबत होता कामा नये याची संपूर्ण काळजी त्या ठिकाणी घेतली पाहिजे असं माझं मत असल्याचं धस म्हणालेदरम्यान, सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही बीडचे लोक पोटाला चिमटा पान 3 वर

# गेवराई तालुक्यात लंपी आजाराचा कहर, पशुपालक संकटात

➡ बंगालीपिंपळा येथे जनावरे दगावली ; पशुसंवर्धन विभागाचे मात्र दुर्लक्ष



गेवराई : गेवराई तालुक्यातील बंगालीपिंपळा, तांदळा, कोळगाव आणि आसपासच्या अनेक गावांमध्ये लंपी रोगाने जनावरांचा जीव धोक्यात आणला आहे. अतिवृष्टीमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता लंपी आजाराची दुसरी मोठी अडचण उभी राहिली आहे. हा लंपी आजार झपाट्याने वाढत असून शेकडो जनावरांना आत्तापर्यंत या आजाराची लागण झाली आहे. या आजाराने बंगालीपिंपळा येथे काही शेतकऱ्यांची जनावरे दगावली असून अनेक जनावरे गंभीर आजारी पडले असून पशुपालक, शेतकऱ्यांमध्ये भिती व्यक्त केली जात आहे. याकडे मात्र पशुसंवर्धन विभागाचे दुर्लक्ष असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मागील महिण्यात अतिवृष्टी झाली, यामुळे खरीपाची पिके होत्याची नव्हती झाली. काही ठिकाणी जमीनी खरडून गेल्या, काही ठिकाणी पिकांची माती झाली. यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला असतानाच आता जनावरांना लंपी आजाराची लागण झाली आहे. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालक आधीच अतिवृष्टीमुळे संकटात सापडले होते, आता लंपी आजाराने त्यांच्या दुःखाला दुहेरी आकार दिला आहे. मागील काही दिवसात या लंपी आजाराने थैमान घातले असल्याचे या भागात दिसत आहे. सध्या अनेक जनावरे या आजारामुळे त्रस्त असून त्यांच्या जिवाची लाहीलाही होत आहे. शेकडो जनावरे या आजाराची शिकार होत असताना पशुसंवर्धन विभाग मात्र गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे. पान 3 वर

# .साताऱ्यात आयुष्य संपवणाऱ्या महिला डॉक्टरवर बीडमध्ये अंत्यसंस्कार, मूळ गावी ग्रामस्थांची गर्दी, कुटुंबीयांचा आक्रोश



बीड : साताऱ्यातील फलटण येथे आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टरवर काल रात्री उशिरा मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे तिला अखेरचा निरोप देण्यात आला. फलटण येथून वडवणी येथे रात्री उशिरा मृतदेह आणल्यानंतर तिच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात आले. अंत्यसंस्कारवेळी नातेवाईकांसह ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात पान 3 वर

# एकत्र काढून ठेवलेली सोयाबीन अज्ञात व्यक्तीने जाळून टाकली ;

## फुले पिंपळगाव येथील घटना



बीड :- माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील एका शेतकऱ्याने शेतातून काढलेली सोयाबीन एकत्र करून शेतामध्येच झाकून ठेवली होती. अज्ञात व्यक्तीने मध्यरात्री ही सोयाबीन जाळून टाकली असल्याची घटना घडली आहे या घटनेमुळे शेतकऱ्याचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

याबाबत माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला सदरील शेतकरी व बीड न्यायालयात वकील म्हणून कार्यरत असणारे अँड. सुरेश सोपानराव साळवे यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादीत असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारात गट नं.260 मध्ये एकुण पान 3 वर

# भव्य शोभायात्रेसह अंबाजोगाईत 'श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञा'चा उत्साहात प्रारंभ

● दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या वतीने 25 ते 31 ऑक्टोबर दरम्यान धार्मिक सोहळ्याचे आयोजन; आमदार नमिताताई मुंदडा यांचा सहभाग



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी दिव्य ज्योती जागृती संस्थान, शाखा लातूर यांच्या वतीने अंबाजोगाई शहराच्या अध्यात्मिक व सांस्कृतिक जीवनाला एक नवी चेतना देणारा 'श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ' हा दिव्य धार्मिक सोहळा आजपासून (25 ऑक्टोबर 2025) योगेश्वरी महाविद्यालय मैदान, अंबाजोगाई येथे मोठ्या भक्तिभावाने सुरु होत आहे.

भव्य मंगल कलश व शोभायात्रा:

या पवित्र ज्ञानयज्ञाच्या प्रारंभापूर्वी, आज योगेश्वरी देवी मंदिरापासून एक भव्य मंगल कलश व शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सजलेले भक्त, विविध मंडळांचे स्वयंसेवक आणि ढोल-ताशांच्या निनादात देवीचा जयघोष करत चाललेल्या भाविकांमुळे संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. या शोभायात्रेत केज विधानसभा मतदारसंघाच्या सन्माननीय आमदार सौ. नमिताताई अक्षय मुंदडा यांनी विशेषत्वाने सहभाग नोंदवला, ज्यामुळे सोहळ्याची शोभा अधिक वाढली.

साध्वी अदिती भारतीजींचे निरुपण:

25 ते 31 ऑक्टोबर 2025 या कालावधीत संपन्न होणाऱ्या या पान 3 वर

# गरिब कुटुंबातील नागरीकांना किराणा किट वाटप




परळी वैजनाथ दि.24 (प्रतिनिधी)

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश दगडू सोनवणे यांच्या वतीने गरीब कुटुंबातील नागरीकांना किराणा किट वाटप करण्यात आले.

गाढे पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश दगडू सोनवणे यांच्या वतीने दिवाळी सणानिमित्त गावातील गरीब कुटुंबातील नागरीकांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे युवक नेते बाबा सोनवणे, शरद सोनवणे, प्रद्युम्न सोनवणे, सुरेश सोनवणे, पान 3 वर

# भरदिवसा घराचे गेट तोडून 27 तोळे दागिने लंपास

## केज तालुक्यातील कोरेगाव येथील घटना



केज : केज तालुक्यात भर दिवसा घराचे लोखंडी गेट तोडून आतील पेटी व धान्याच्या कोठीत ठेवले 27 तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेले आहेत. घटनास्थळी श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञ यांच्या पथकाने भेट दिली आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील कोरेगाव येथील वैतागवाडी नावाच्या वस्तीवर राहत येथे 23 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5:30 वा. च्या दरम्यान बळीराम भगवान तांदळे हे आणि त्यांची पत्नी शेतात गेले असता अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी चॅनल गेटचे कुलुप तोडुन घरात असलेल्या पेटी आणि धान्याच्या कोठीत ठेवलेले आठ तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, सोन्याचा हार, नेकलेस, मिनी गंठण, झुंबर, वेल, चैन, अंगठ्या, सोन्याची पोत, नथ, सोन्याची साखळी, सेव्हन पीस, सोन्याचे फुलं, पान 3 वर

# बँकेतून शेतकऱ्याचे 50 हजार लहान मुलाने लांबविले, घटना सीसीटीव्हीत कैद

## धारूर तालुक्यातील अरणवाडी येथील शेतकरी सुमंत फुटाणे यांची रक्कम



धारुर : धारूर तालुक्यातील अरणवाडी येथील शेतकरी सुमंत फुटाणे हे अनुदानाची रक्कम उचलण्यासाठी धारूर येथील एसबीआय बँकेत आले होते. यावेळी दिवसाढवळ्या त्यांनी खात्यातून काढलेल्या 50 हजार रुपयांची चोरीची धक्कादायक घटना आज (दि.24) घडली. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. धारूर तालुक्यातील अरणवाडी येथील शेतकरी सुमंत फुटाणे यांनी आज दुपारी बँकेतून रक्कम काढून काउंटरवर ठेवली. यावेळी चौकशी सुरु असतानाच एका लहान मुलाने नकळतपणे पन्नास हजार रुपयांचे बंडल उचलले व त्वरित पळ काढला. या मुलासोबत आणखी एक साथीदार मुलगाही उपस्थित असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसून आले आहे.

या घटनेनंतर ग्राहकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, दिवसाढवळ्या बँकेच्या परिसरात अशा प्रकारे चोरी घडल्याने सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. बँक व्यवस्थापन व पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला पान 3 वर

# सामाजिक कार्याचा वारसा जपणारे, शेतकरीपुत्र संदीप चौंडे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- शेतकऱ्यांचा आवाज आणि समाजाचा आधारस्तंभ असलेल्या मा.श्री.संदीप चौंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव झाला. संदिप चौंडे यांच्यासारख्या ध्येयनिष्ठ आणि तळमळीच्या सामाजिक कार्यकर्ते यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाल, श्रीफळ,फेटाबांधून, पुष्पहार, पेढा भरून सत्कार करण्यात आला.

सामाजिक कार्याचा वारसा जपणारे, शेतकरीपुत्र संदीप चौंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना प्रत्येक्ष भेटुन तसेच मोबाईल, एसएमएस, व्हाट्सअप आदींच्या माध्यमातुन शुभेच्छा दिल्या. आज सकाळीपासुन रात्री उशीरापर्यंत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतच होता. दरम्यान शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचे सामाजिक कार्याचा वारसा जपणारे, शेतकरीपुत्र संदीप पान 3 वर

# गोरबंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेटनुसार एसटी आरक्षण द्या — शरदभाऊराठोड यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन



मुंबई (प्रतिनिधी) गोरबंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण द्यावे, या मागणीचे निवेदन अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव शरदभाऊ राठोड यांनी राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांना दिले.

हैद्राबाद संस्थानच्या काळात गोरबंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला होता. त्या काळातील गॅझेट नोटिफिकेशनमध्ये या समाजाचा स्पष्ट उल्लेख असून, राज्य पुनर्रचनेनंतर महाराष्ट्रात या समाजाला एसटी प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळणे थांबले आहे. परिणामी समाजातील विद्यार्थी, युवक आणि शासकीय सेवेत जाण्याची इच्छा असणारे उमेदवार अन्यायाला सामोरे जात आहेत.

यावेळी प्रस्तुत निवेदनात राठोड म्हटले पान 3 वर

# परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीत सुशिक्षित वर्गाचा सहभाग गरजेचा

➡ डॉ. बाबासाहेबचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा. जमीर शेख



परळी वैजनाथ प्रतिनिधी : परळी नगरपरिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. शहरातील विविध राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवार प्रचारयुद्धात उतरले आहेत. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सभा, प्रचारफेऱ्या, सोशल मीडियावरील मोहिमा सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक वचन पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेचा विषय बनले आहे

सुशिक्षित वर्गाने राजकारण या विषयाकडे अजिबात दुर्लक्ष करू नये, अन्यथा अर्धशिक्षितांचे तुम्हाला गुलाम व्हावे लागेल.

परळी शहरात अनेक सुशिक्षित, सामाजिक कार्यकर्ते, तरुण उद्योजक आहेत, परंतु राजकारणात त्यांचा सक्रिय पान 3 वर

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जयघोष म्हणजे प्रत्येक शिवसैनिकाच्या हृदयातील दीप-अभयकुमार ठक्कर

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तर्फे परळीत दिव्यांचा लख्ख प्रकाश



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – दीपावली पाडव्याच्या शुभप्रसंगी जय महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने परळी वैजनाथ येथील पॉवर हाऊस समोरील विश्व हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौकात दिव्यांचा लख्ख प्रकाश करण्यात आला.

या वेळी परिसर फटाक्यांची आतिषबाजी करत "हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे अमर रहे... जय भवानी जय शिवाजी,आवाज कुणाचा? शिवसेनेचा!" या गगनभेदी घोषणांनी दुमदुमला. चौकातील दिव्यांच्या तेजात आणि जयघोषांच्या गजरात बाळासाहेब ठाकरे यांच्या अजरामर कार्याला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमास शिवसेना मा.उपजिल्हाप्रमुख तथा मा.नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर, युवासेना जिल्हा समन्वयक प्रा. अतुल दुबे, दैनिक जगमित्र चे संपादक बाळासाहेब कडबाने, ज्येष्ठ पान 3 वर

# धनगर एसटी आरक्षणासाठी बीड जिल्ह्यात आनंद कोकाटे या तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

● धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीकरता दिलेले बलिदान वाया जाऊन देणार नाही.. प्रकाश भैय्या सोनसळे (अध्यक्ष धनगर समाज संघटना महाराष्ट्र राज्य)



वडवणी (प्रतिनिधी):-

मांजरसुंबा येथिल धनगर समाजातील आनंद न्यायमूर्ती कोकाटे वय-38 यांने धनगर समाजाला एसटी आरक्षण अंमलबजावणी लढा अनेक वर्षापासून धनगर समाजाने मोर्चे,आंदोलन, रस्ता रोको, आमरण उपोषणे करूनही या धनगर समाजाला राज्य सरकार हे जाणीवपूर्वक आरक्षण अंमलबजावणी करत नसल्याकारणामुळे आपल्या मूलाबाळांना आरक्षण नसल्यामुळे कसे होईल या नैराश्यातून गेली दहा ते पंधरा दिवस डोक्यामध्ये आरक्षणाचा विचार येत होता आणि एक दिवस असा विचार आला की पान 3 वर

# वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीसाठी तीन नोव्हेंबर रोजी मुलाखती. प्रेम जगतकर



परळी प्रतिनिधी = वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीसाठी तीन नोव्हेंबर रोजी मुलाखती घेण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी शहराध्यक्ष प्रेम जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की आगामी होऊ घातलेल्या परळी नगर परिषद निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जे इच्छुक निवडणूक लढविण्यास तयार आहेत त्यांनी दिनांक दोन नोव्हेंबर 25 पर्यंत उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल करावे. विशेष म्हणजे यामध्ये तरुण युवकांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यानंतर दिनांक 3 नोव्हेंबर 2025 सोमवार रोजी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेश भाऊ कांबळे , वंचित बहुजन युवा आघाडीचे पान 3 वर